


# ज्योती पिक्चर्स

विजय कोंडके :- निर्माता, दिग्दर्शक, वितरक

३०२, गार्डन व्ह्यू , प्लॉट नं.४१, टर्नर रोड नं.१६, बांद्रा (प.) मुंबई ४०००५० मो. : ९९२०९७०७०५

email : vdkondke@yahoo.co.in


दि. १५/०५/२०१४

प्रति,

डॉ. धनसिंग चौधरी

संमोहन उपचारतज्ञ, पुणे

विषय :- आपल्या संमोहन उपचारांच्या कार्यशाळेबाबत...

महोदय,

चित्रपट सृष्टीतला कोणताही व्यवसाय असो, निर्माता, लेखक, दिग्दर्शक, संगीत, नृत्य, वितरक, कलाकार, ....इ. चित्रपट तयार होऊन प्रदर्शित होईपर्यंत तो हिट होतोय की फ्लॉप होतोय हे कोणीही सांगू शकत नाही. चित्रपटात करोडो रूपये ओतूनसुद्धा, प्रत्येक व्यक्तीने खूप मेहनत घेऊनसुद्धा, यश-अपयश, नफा-नुकसान,... यापैकी हाती काय मिळेल याची कोणीही गॅरंटी देऊ शकत नाही. आज चित्रपटसृष्टीकडे जुगार, नशिबाचा खेळ म्हणून पाहिलं जातं. आणि तशात डे शिफ्ट, कधी नाईट शिफ्ट तर कधी डबल शिफ्ट! शुटींग कधी उन्हात तर कधी पावसात ! त्यात आणखी प्रवास, कुटूंबापासून दूर राहणं, बाहेरचं खाणं, हे वेगळंच ! थोडक्यात काय, तर या क्षेत्राशी संबंधीत बहुतेक व्यक्ती या ना त्याकारणाने कायम तणावाखाली असतात. चित्रपटाची दर्जेदार निर्मिती करण्यातले हे अडथळेच म्हणावे लागतील. या सर्व गोष्टींचा परिणाम त्यांच्या मानसिक तसेच शारीरिक आरोग्यावरही होतो. चित्रपट अपेक्षेप्रमाणे बनो की न बनो, यापेक्षा अधिक चांगला चित्रपट आपण निर्माण करू शकलो असतो हि खंत सारखी मनाला बोचत राहते.

वरील समस्यांवर काहीतरी उपाय योजना करता आली पाहिजे, हा विचार नेहमीच डोक्यात घोळत राहायचा. त्याच काळात तुमचा "कामयाबी की ओर" हा कार्यक्रम दादरच्या "शिवाजी मंदिरात" बघण्यात आला. कार्यक्रमातील अंतर्मनाशी संबंधीत प्रात्यक्षिकं बघून मी चकीत झालो, आणि माझ्या लक्षात आलं की, चित्रपट क्षेत्राशी संबंधित बहुतेक व्यक्तींना आपल्या कार्यशाळेची आवश्यकता आहेच. आजपर्यंत माझ्या युनिटच्या बऱ्याच व्यक्तींना मी आपल्याकडे कार्यशाळेत पाठविले. सर्वांनाच खुप चांगले फायदे झाले. तुम्ही हाती घेतलेले हे कार्य कौतुकास्पद आहे

धन्यवाद !

आपला,

विजय डी. कोंडके

(माहेरची साडी :- निर्माता, दिग्दर्शक, वितरक.

अध्यक्ष :- अखिल भारतीय चित्रपट महामंडळ)